# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा
(स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्रमांक- ०२१६२-२३३९२३ फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०२३२
वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


प्रेसनोट दिनांक २०/०७/२०२२

**(स्थानिक गुन्हे शाखा, सातारा, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पाटण व ढेबेवाडी पोलीस ठाणे यांची कारवाई)**

**(गुप्त धनाच्या आमिषातून स्वत:च्या नातीचा ३ वर्षापूर्वी गळा चिरुन केलेल्या खुनाचा (नरबळीचा) अत्यंत क्लिष्ट, गंभीर स्वरुपाचा गुन्हा कौशल्यपुर्वक तपास करुन उघड.)**

दि.२२/०१/२०१९ रोजी ०७.०० ते १६.१५ वा.चे.दरम्यान मौजे करपेवाडी ता.पाटण गावचे हद्दीत देसाई शेत नावचे शिवारात ऊसाचे शेतात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन धारधार हत्याराने मयत भाग्यश्री संतोष माने वय १७ वर्षे हिचा गळा कापून खुन केला म्हणून दिले फिर्यादीवरुन ढेबेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं. ०७/२०१९ भादविक ३०२, २०१, १२०(ब) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादूटोना यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्याचा तपास श्री.विवेक लावंड, उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग पाटण हे करीत आहेत. गुन्हयाचे तपासामध्ये घटनास्थळावरील तसेच परिस्थीतीजन्य पुराव्यावरुन नमुद मुलीचा खुन हा नरबळी करीता करण्यात आला असल्याचे निष्पन्न झाले होते.

श्री.अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून सदरचा प्रकार हा नरबळीचा असल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना श्री.विवेक लावंड, उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग पाटण व श्री.किशोर धुमाळ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सातारा व श्री.संतोष पवार सहायक पोलीस निरीक्षक ढेबेवाडी पोलीस ठाणे यांना दिल्या. त्याप्रमाणे नमुद गुन्हा उघडकीस आणण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा सातारा, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पाटण व ढेबेवाडी पोलीस ठाणेकडील पथके कार्यरत होती.

श्री.संतोष पवार सहायक पोलीस निरीक्षक ढेबेवाडी पोलीस ठाणे हे गुन्हयाचे तपासामध्ये तांत्रिक विश्लेषन करीत होते त्यांना तांत्रिक विश्लेषन करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक मदत करीत होते. तपास पथकास दोन संशईत इसम गुन्हयाच्या घटनेच्यावेळी त्या परिसरामध्ये असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे तपासपथकाने त्यांना लक्ष करुन त्यांच्या हलचालीवर बारकाईने लक्ष पुरविण्यास सुरुवात केली. नमुद व्यक्तींच्या हलचाली पडताळत असताना तपास पथकास सदरचे इसम हे एका मांत्रिकाच्या संपर्कात असल्याचे तसेच तो मांत्रिक गुन्हयाच्या घटनेच्यावेळी घटनास्थळाचे परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यादृष्टीने नमुद दोन इसमांचेकडे तपास पथकांनी सखोल व बारकाने विचारपुस केली असता त्यांनी गुप्तधनाच्या अमिषापोटी मांत्रिकाचे सांगण्यावरुन मयत मुलीची आजी, दोन संशईत इसमांपैकी एक इसम व आणखी एक स्त्री (देवऋषीन) यांनी कट रचून संगणमताने मुलीस गुंगीचे औषध देवून, तिला उसाचे शेतात नेवून तिचा गळा चिरुन तिचा बळी दिला असल्याचे सांगीतल्याने गुप्त

धनाच्या आमिषातून स्वत:च्या नातीचा ३ वर्षापुर्वी गळा चिरुन केलेल्या खुनाचा (नरबळीचा) गुन्हा उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पाटण, स्थानिक गुन्हे शाखा सातारा व ढेबेवाडी पोलीस ठाणे कडील तपासपथकांनी उघड करुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

**श्री.संतोष पवार, प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक, ढेबेवाडी पोलीस ठाणे यांनी ढेबेवाडी पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी म्हणून चार्ज घेतल्यानंतर नमुद खुनाचा गुन्हा उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग यांचेकडे तपासावर प्रलंबित होता व उघडकीस आला नव्हता. सदरचा गुन्हा हा तीन वर्षापासून उघडकीस न आल्याने सहा.पोलीस निरीक्षक संतोष पवार यांनी गुन्हयाचे आवलोकन करुन, गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने विशेष प्रयत्न करुन, परिश्रम घेवून गुन्हयातील संशईत आरोपींबाबत तसेच त्यांचे हलचालीबाबत माहिती प्राप्त करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला असल्याने त्यांचे व स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस अंमलदार साबीर मुल्ला, मोहन नाचण, राजकुमार ननावरे, मयुर देशमुख, मोहसिन मोमीन, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पाटण येथील पोलीस अंमलदार हणमंतराव पाटील, प्रशांत चव्हाण, चंद्रकांत पाटील, माणिक पाटील, संग्राम बाबर यांचे श्री.अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी विशेष अभिनंदन केलेले आहे.**

श्री.अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांचे सूचना प्रमाणे श्री.विवेक लावंड उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण उपविभाग, श्री. किशोर धुमाळ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सातारा, यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संतोष पवार ढेबेवाडी पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस अंमलदार साबीर मुल्ला, मोहन नाचण, राजकुमार ननावरे, मयुर देशमुख, मोहसिन मोमीन, संकेत निकम, दिपाली यादव, शकुंतला सणस, यशोमती काकडे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पाटण येथील पोलीस अंमलदार हणमंतराव पाटील, प्रशांत चव्हाण, चंद्रकांत पाटील, माणिक पाटील, संग्राम बाबर यांनी सदरची कारवाई केलेली असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे श्री.अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केलेले आहे.

---

पोलीस अधीक्षक सातारा, करीता

प्रति-

सर्व संपादक,

---

